## लावण्यवती

देहात तिच्या रतीचा भास होता
अन बांध्यात रंभेचा उन्माद
चालीत तिच्या हंसाचा डौल होता
कांतीला तेजस्वी झळाळी

ओठात अमृताचे घट होते
नजरेत तिच्या मदिरेचे प्याले
वदनी कुंदकळ्या होत्या अन
गालावर कश्मीरी गुलाब

पापण्यांत जुईचे मार्दव होते
केसांत कृष्णमेघांची घनता
बोटे तिची जणु चवळीच्या शेंगा
नासिकेवर तलवारीची धार

सर्वांगास घायाळ करणारी
सौंदर्याची ती खाणच होती, मात्र
कमनीय या बालेत एकच कमी होती
या युवतीस अस्तित्व नव्हते!

*By: Abhay B. Joshi*
*Summer 1987*